दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ नुसार वन विभागाच्या अधिपत्याखालील गट-अ ते गट-ड संवर्गातील पदे दिव्यांगांसाठी सुनिश्चित करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**वन विभाग**

**शासन पूरकपत्र क्र.एफएसटी-०६/२१/प्र.क्र.१६५/वने-४**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड

मंत्रालय, मुंबई-४०००३२.

दिनांक: २१ जुलै,२०२६.

**संदर्भ:** १. महसूल व वन विभाग, समक्रमांकाचा दि.१९.०७.२०२१ रोजीचा शासन निर्णय.

२. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.दिव्यांग-२०२२/प्र.क्र.८३/१६-अ, दि. २०.०४.२०२३.

**शासन पूरकपत्र:**

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ मधील कलम ३३ नुसार दिव्यांगांसाठी शासन सेवेतील पदांची पदसुनिश्चिती करणे आवश्यक आहे. त्यानुसार केंद्र शासनाने दि.०४.०१.२०२१ च्या अधिसूचनेन्वये दिव्यांगांसाठी सुनिश्चित केलेल्या पदांची यादी प्रसिध्द केली आहे. तद्नुसार केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या आस्थापनेवर असलेली समान पदे तसेच ज्या पदांची पदनामे भिन्न असली तरी, केंद्र शासनाने प्रसिध्द केलेल्या यादीतील ज्या पदांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या, कामाचे स्वरुप समान आहेत अशी गट- अ ते गट- ड संवर्गातील पदे दिव्यांगासाठी सुनिश्चित करण्याच्या सूचना सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दि.०२.०२.२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये देण्यात आल्या आहेत. त्यास अनुसरून संदर्भाधीन क्र.०१ येथील दि.१९.०७.२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये वन विभागाच्या अधिपत्याखालील गट-अ ते गट-ड संवर्गातील पदे दिव्यांगांसाठी सुनिश्चित करण्यात आलेली आहेत.

२. सामान्य प्रशासन विभागाने संदर्भाधीन क्र.२ येथील दि.२०.०४.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये दिव्यांग अधिकारी/ कर्मचारी यांना गट "ड" ते गट "अ" च्या निम्नस्तरापर्यंत (Lowest rung of group "A") मधील पदांवर पदोन्नतीमध्ये दिव्यांग आरक्षणाबाबत सुधारणा केली आहे. त्यास अनुसरुन संदर्भाधीन क्र.१ येथील महसूल व वन विभागाच्या दि.१९.०७.२०२१ च्या शासन निर्णयासोबतच्या विवरणपत्र-अ मधील अ.क्र.१० येथील "लघुलेखक उच्चश्रेणी", गट-ब (अराजपत्रित) या संवर्गाच्या दिव्यांग प्रकारामध्ये खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

| **अ.क्र.** | **पदनाम** | **शारीरिक पात्रता** | **म. व व. वि. शा.नि. दि.१९.०७.२०२१ मधील तरतूद (रकाना क्र.४)** | **सा.प्र.वि. शा.नि. दि.२०.०४.२०२३ मधील तरतुदीनुसार सुधारणा** |
|---|---|---|---|---|
| १० | लघुलेखक उच्चश्रेणी | S,ST,W,MF, SE,H | a) B, LV<br>b) OA,OL,BL,CP,LC,Dw,AAV,MDy<br>c) ASD (M), SLD, MI<br>d) MD involving (a) to (c) above | (a) B,LV<br>(b) D,HH<br>(c) OA,OL,BL,CP,LC,Dw, AAV,MDy<br>(d) ASD (M), SLD, MI<br>(e) MD involving (a) to (d) above |

२.    सदरहू शासन पूरकपत्र सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२०.०४.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये दिलेल्या सूचनेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

३.    सदर शासन पूरकपत्र महाराष्ट्र शासनाच्या www.maharshtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०७२११७१९५४०८४० असा आहे. हे पूरकपत्र डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SAPKAL PRASHANT PRALHAD

Digitally signed by SAPKAL PRASHANT PRALHAD
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT,
2.5.4.20=C2EC242CAEF55E035A22245B60A2752C90753E697F5E56596B3524D34280A891, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=9548CB33E24729A59B6A5C72EE905604BA53420C8EACFD34E9E8C2460B8AA409, cn=SAPKAL PRASHANT PRALHAD
Date: 2026.07.21 17:20:40 +05'30'

**(प्रशांत सपकळ)**
**कार्यासन अधिकारी,महसूल व वन विभाग**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय मुंबई,
३. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा.विरोधी पक्ष नेता, विधान परिषद/ विधान सभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
५. मा.मुख्य सचिव यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
६. सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई,
७. सर्व मंत्रालयीन विभागाचे अमुस/प्र.स./सचिव,
८. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई,
९. सचिव,मा.सभापती, विधानपरिषद, विधानमंडळ, मुंबई,
१०. सचिव,मा.अध्यक्ष, विधानसभा, विधानमंडळ, मुंबई,
११. सचिव,महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
१३. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
१४. प्रधान मुख्य वनसंरक्षक,सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१५. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, (सर्व)
१६. मुख्य वनसंरक्षक (सर्व)/वनसंरक्षक (सर्व) / उप वनसंरक्षक (सर्व) / विभागीय वन अधिकारी (सर्व)
१७. महालेखापाल -१ व २ (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
१८. जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व ),
१९. निवडनस्ती,वने-४(फ-४) कार्यासन महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.